# संत ज्ञानेश्वर तत्वज्ञान व चिंतन

डॉ भरत भीमराव जाधव

मराठी विभाग

कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा

Bharatjadhav13@rediffmail.com

9421183837

महाराष्ट्रामध्ये विविध धर्म व जाती पंथाचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विविध पंथाचे आचारधर्म हे शेवटी मनुष्याच्या आत्मोन्नतीपर्यंत पोहोचतात. प्रत्येक पंथाचा आचारधर्म वेगवेगळा असला तरी अंतिम ध्येय हे परमेश्वर प्राप्ती व मोक्षप्राप्ती हेच आहे. महाराष्ट्रामध्ये शैव आणि वैष्णव हे दोन मुख्य पंथ आहेत. काही जण शिवाचे म्हणजे शंकराचे पूजन करतात. तर काहीजण वैष्णवाचे म्हणजे विष्णूचे पूजन करतात. आदिशक्ती आणि परमात्मा यांचे ऐक्य सांगणारा 'वारकरी संप्रदाय' हा एक महत्त्वाचा संप्रदाय म्हणून ओळखला जातो. 'शाक्त संप्रदाय', 'नाथसंप्रदाय', 'दत्त संप्रदाय', 'समर्थ संप्रदाय' असे अनेक संप्रदाय महाराष्ट्रामध्ये गुण्यागोविंदाने नांदत आहेत . पैकी काही संप्रदाय हे काळाच्या पडद्याआड लुप्त झाले. परंतु वारकरी संप्रदायाची वाढ मात्र झपाट्याने होत असलेली दिसून येते.

"संत कृपा झाली | इमारत फळा आली |

ज्ञानदेवे रचिला पाया |उभारिले देवालया|

नामा तयाचा किंकर | केलेल्या हा विस्तार |

जनार्दनी एकनाथ | खांब दिला भागवत |

तुका झालासे कळस ||"

या बहिणाबाईच्या अभंगाप्रमाणे अनेक संतांनी वारकरी संप्रदायाचा विस्तार करण्याचे महान कार्य केले आहे. वारकरी संप्रदायाला 'भागवत धर्म' म्हणून संतांनी संबोधलेले आहे. भगवंताला सर्वस्व अर्पण करणारा तो म्हणजे 'भागवत' यावरूनच भागवत संप्रदायाचे तत्त्वज्ञान

व आचारधर्म समजतो. वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला असे मानले जाते, परंतु ज्ञानेश्वरांच्या आधीपासून वारकरी संप्रदायाची वाटचाल सुरू होत असावी कारण ज्ञानेश्वरांचे आई-वडील हे पंढरपूरच्या विठ्ठलाची वारी करत होते. ज्ञानेश्वरांच्या आई-वडिलांना कर्मठपणा व भोंदुगिरीमुळे मरण पत्करावे लागले. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई याना अनन्वित छळ सोसावा लागला. या सर्व पायावरच वारकरी संप्रदायाच्या भक्कम तत्त्वज्ञानाची उभारणी झाली असेच म्हणावे लागते.

संत ज्ञानेश्वर जन्म आणि लेखन कार्य

संत ज्ञानेश्वरांचा जन्म शके ११९७ मध्ये झाला, तर त्यांनी समाधी शके बाराशे अठरा मध्ये घेतली. जेमतेम बावीस वर्षाचा कालखंड ज्ञानेश्वरांना लाभला . महाराष्ट्रात तेराव्या शतकात रामदेवराय यादव यांची सत्ता होती. या काळात बौद्ध, जैन, लिंगायत, वीरशैव, महानुभाव या पंथाचे प्राबल्य होते. हेमाद्री पंडित यांच्या 'चतुर्वर्गचिंतामणी' या ग्रंथाने कर्मकांडाचे स्तोम माजवले होते. अशा काळात सर्वसामान्य लोकांना खरा भक्तिमार्ग सांगण्याची नितांत गरज निर्माण झाली होती. या काळात लोकांचे अज्ञान दूर होऊन त्यांना भक्तीचा व निष्काम कर्मयोग ज्ञानेश्वरांनी आपल्या लेखणीतून मांडला ज्ञानेश्वरांनी मराठी वाङमयातील अक्षर 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला. त्याचबरोबर 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', 'हरिपाठाचे अभंग', 'विराण्या', 'गौळणी' असे विपुल लेखन केले आहे. भक्ताना त्यांनी अमृताचा अनुभव आपल्या अद्वैत तत्वज्ञानातून दिला. प्राचीन धर्मग्रंथ संस्कृत भाषेतून लिहिले होते. सामान्य लोकांना ते वाचण्याची मुभा नव्हती. पारमार्थिक ऐश्वर्य सर्वसामान्यापर्यंत पोहोचले पाहिजे म्हणून ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञान त्यांनी सोप्या महाराष्ट्री प्राकृत भाषेत प्रतिपादन केले. भगवद्गीता ही मानवी जीवनाचे शास्त्र म्हणून ओळखली जाते त्याचे निरुपण प्रत्यक्ष श्रीकृष्णाने केले आहे. श्री कृष्ण व अर्जुन यांचा संवाद रूपाने अध्यात्म व नीतिशास्त्र त्यातून प्रकट झाले आहे. त्याचेच निरूपण ज्ञानेश्वरांनी केले आहे. अमृतानुभव या ८०४ ओवीसंख्या असलेल्या ग्रंथात शिवशक्ती, शब्द मंडन, शब्द खंडन, ज्ञानाचा अज्ञानाचा निरास, स्फूर्ती वाद यांचे निरूपण केले आहेत. तत्त्वज्ञ अध्यात्माचा अर्क म्हणून ही आपणास या ग्रंथाकडे पाहता येते. चांगदेव-पासष्टी हे 65 ओव्यांचे काव्य असून पत्ररूप काव्य म्हणूनही आपणास त्याचा उल्लेख करता येईल. त्यामध्ये तत्त्वज्ञानाचे मूलभूत सिद्धांत सूत्र

रूपात मांडले आहे. “एका योगी पुरुषाने दुसऱ्या योगी पुरुषाला केलेला हा बोध असून वेदांताचे सार त्यातून प्रकट झाले आहे. चांगदेवपासष्टी हे भावयुक्त , एकात्मक, मनोहर, परतत्वपुष्ट पारमार्थिक तत्त्वज्ञान काव्य आहे” असे बी. एन. पाटील म्हणतात. (बी. एन. पाटील :२००९:२५३) हरिपाठाच्या सत्तावीस अभंगातून तत्वज्ञान व आत्मानुभूती चे निरूपण आले आहे. परमेश्वर भक्तीचा साधा, सोपा, नाममहिमा त्यांनी यातून सांगितला आहे.

देवाचिये द्वारी |उभा क्षणभरी | तेणे मुक्ती चारी | साधियेल्या ||

हरी मुखे म्हणा | हरी मुखे म्हणा |पुण्याची गणना कोण करी ||

असोनि संसारी |जीवे वेगू करी |वेदशास्त्री उभारी बाह्य सदा ||

ज्ञानदेव म्हणे व्यासांचीये खुणे | द्वारकेचा राणा |पांडवा घरी ||

देवाच्या दारात उभे राहून नामस्मरण करणाऱ्या भक्ताला प्रत्यक्ष श्रीकृष्ण भेटायला येतो. असा साधा सोपा सरळ मार्ग प्रतिपादन केला आहे. ‘अतींद्रिय परी भोगविन |इंद्रिया करवी |’ अशी प्रतिज्ञा करून तरी ‘इंद्रिया देऊनी कवाडा | रूदयी भोगी | (संत ज्ञानेश्वर 9. 134) असे ज्ञानदेव सांगतात. ‘अवघाची संसार सुखाचा करीन | आनंदे भरीन तिन्ही लोक ||’ असेही ते सांगतात. त्यामुळेच ‘यारे यारे लहानथोर | याती भलत्या नारी नर | न करावा विचार | सानथोर ||’ असे सांगून सर्व लहान मोठ्या आणि सर्वच जाती धर्मातील स्त्री-पुरुषांना भक्तीचा मार्ग खुला करणाऱ्या वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला असे म्हटले जाते. “ज्ञानेश्वर हे अध्यात्म विचार व्यक्ती हिताच्या मर्यादित दृष्टीने न करता समाज हिताच्या व्यापक दृष्टीनेच करतात बहुजनाच्या हिताची व सुखाची चिंता हाच ज्ञानेश्वरीचा अनन्यसाधारण विशेष आहे “ असे म वा धोंड म्हणतात. ( म. वा. धोंड :१९८० :७७ ) ज्ञानेश्वरांचे हे व्यापक समाजहित ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील पसायदान यामध्ये सार रूपाने उमटले आहे. त्यांच्या व्यक्तित्वात ज्ञान, व्यासंग व तर्कबुद्धी प्रमाणे सृष्टी व्यापार, मनुष्य व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण, भक्ती विश्वाची एकरूपता व प्राणी जातीविषयी अपार कणव यांचा सुरेख संगम असलेला आपणास दिसून येतो. ज्ञानेश्वरांनी द्वैत भक्तीचा सिद्धांत मांडला आहे. ज्ञानदेवांनी भक्तीला निष्ठेची पदवी प्राप्त करून दिली ती भक्तीची ज्ञानाशी व कर्मयोगाची सांगड घालून असे म.वा. धोंड म्हणतात. (म वा धोंड :१९८० :६१ )

'कि भक्ती सुखालागी | आपणचि जाला दो भागी |

वाटुनीया अंगी | सेवकही वाणी |

येरा नाव मी ठेवी |मजा भजतेया ओज बरवी |

न भजतेया दावी | योगीया जो || ( संत ज्ञानेश्वर 12. 186, 87) यामधून ज्ञानदेवांनी भक्तिमार्गाचा एक वेगळा अविष्कार दाखवला आहे. ज्ञानदेवांनी कर्मयोगाची भक्तीशी सांगड घातली आहे . भक्ती केल्यामुळे परमेश्वर प्राप्ती होते व परमेश्वर भक्ताला मोक्षप्राप्ती करून देतो. श्री विठ्ठल हा ज्ञानेश्वरांचे आराध्य दैवत आहे . विठ्ठलाला श्रीकृष्णाचा अवतार मानला आहे. त्यामुळेच विठ्ठल भक्ती म्हणजे, एक प्रकारे श्रीकृष्णभक्ति होय.

**तत्वज्ञान**

ज्ञानदेव अर्थाकडून शब्दांकडे आले आहेत. वाचकाला हा अर्थ समजून घेण्यासाठी शब्दांकडून अर्थाकडे जावे लागते. एका तत्वाभोवती अनेक प्रकारचे वलय असते, ते वलय अधिष्ठानावर अवलंबून असते. त्यामुळे ज्ञानदेवांचे तात्विक अधिष्ठान समजून घेणे अगत्याचे ठरते. तत्वाची व्याख्या शास्त्रकार, उपनिषदे, स्मृती इत्यादी प्रकाराने केली जाते. 'गीता' हे एक प्रकारचे 'शास्त्र' म्हणूनच ज्ञानदेवानी वर्णन केले आहे. ते म्हणतात 'गीता शास्त्र साधले आम्हा'. इंद्रियांच्या पलीकडे असणारे विश्वरूप तत्व चर्मदृष्टीला दिसत नाही, त्यासाठी इंद्रियातीत होऊन अनुभव घ्यावा लागतो. संत म्हणजेच सत्याच्या अस्तित्वाचा अंत ज्याने साध्य केला आहे. भक्ती म्हणजे विभक्ती नसणारी. तत्त्व म्हणजे कोणत्याही काळी कोणत्याही अवस्थेत ज्याच्या स्थितिस्थापकत्वाम्ध्ये फरक पडत नाही, सर्व अवस्थेत ज्याचे अस्तित्वपण अखंड असते अशी गोष्ट . जग म्हणजे, ज जन्माला येणे व ग म्हणजे गमन करणे अशी जागा. सांख्य म्हणजे ज्ञान. नास्तिक म्हणजे अस्तित्व अमान्य. संख्याशास्त्राची माया व आत्मा ही दोन प्रधान तत्त्वे आहेत भजन भज ( भावना ). 'मी आत्मा मी ब्रम्ह' मानून भक्ती करणे. ज्ञान म्हणजे सम्यक ज्ञान, म्हणजेच ईश्वराचे अपरोक्ष अनुभव. ज्ञानशास्त्र, सत्ताशास्त्र, व नीतिशास्त्र यांचे विवेचन ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी मध्ये केले आहे. ब्रह्म निर्गुण आणि ईश्वर सगुण आहेत. जिवाचे ब्राह्माशी ऐक्य झाले पाहिजे. हि ऐक्य होण्याची प्रक्रिया हळूहळू होणारी आहे त्यामुळे त्यास 'क्रममुक्ती' ती असे संबोधन त्यांनी वापरले आहे. संत ज्ञानेश्वरांनी मायावाद, चिद्विलास वाद, प्रतिवाद यांची

उकल खूप सुंदर रीतीने केले आहे. मन हे चंचल असते अभ्यास आणि वैराग्य याच्या मदतीने आत्मानुभव याची गोडी लावून त्याला स्थिर करता येते, तर कर्त्याच्या शुद्ध बुद्धीवरच कर्माची नैतिकता अवलंबून असते. कर्म हे निष्काम असावे, अशा निष्काम कर्माने मनुष्य अधिक शुद्ध बनतो. मनुष्याला स्वतःला नैतिक मानदंड बनता येते . आत्मानंद प्राप्ती हे नीतीचे अंतिम साध्य असल्याने मनुष्याने दुर्गुणांचा त्याग करावा व सद्गुणी व्हावे. ईश्वरभक्ती हा सदगुणी होण्याचा एक चांगला मार्ग आहे.

साधकास स्थितप्रज्ञा ची अवस्था प्राप्त झाली तर आनंदमय परमात्मा सर्वत्र भरल्याची जाणीव निर्माण होते. 'किंबहुना चराचर तोचि झाला' ही परमात्म्याची सार्वत्रिक जाणीव विश्व व्यापून टाकते. संत ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वची माझे घर' मानले व त्या घराच्या सुखासाठी पसायदान म्हणजेच प्रसाद दान मागितले. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि भक्तिमार्ग या तीनही मार्गाने परमेश्वरापर्यंत पोहोचता येते . जीव शिव ऐक्य झाले पाहिजे यासाठी यापैकी कोणताही मार्ग निवडला तरी चालतो. कर्मसिद्धांत आणि धर्म सिद्धांत सांगताना ज्ञानेश्वरांनी कर्म व धर्माची उचित सांगड घातली आहे त्यांनी कर्मालाच आपला धर्म मानण्यास सांगितले आहे. प्रत्येकाने आपले विहित कर्म करणे म्हणजेच स्वधर्म सांभाळणे असे त्यांचे प्रांजळ मत होते. आज आपण धर्माची व्याख्याच बदलून टाकली आहे. 'धारयेती धर्म'- धारण करणारा धर्म होतो. त्यामध्ये उचित कर्म धारण करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. ही बाब सोईस्करपणे आपण विसरलो आहोत. प्रत्येकाने आपले स्वतःचे निश्चित केलेले काम इमानेइतबारे करणे हा प्रत्येकाचा धर्म आहे.

'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो | जो जे वांछील तो ते लाहो | प्राणीजात || ही मनोकामना पूर्ण करण्याची प्रक्रिया आहे ती धर्माच्या आचरणातून सिद्ध होऊ शकते.

ईश्वराची अनन्यसाधारण भक्ती करावी , मनुष्याने त्यालाच शरण जावे ईश्वराच्या कृपेशिवाय मनुष्याचे जगातील स्थान शून्य आहे. ईश्वराचे नामस्मरण करावे अनन्यभावाने पराभक्ती करावी. ही भक्ती अद्वैत भक्ती असते. जीव शिवाचे ऐक्य त्याच वेळी शक्य आहे. परमेश्वर सानिध याचा अनुभव हा अतींद्रिय व अंतत्स्फूर्त असतो असे पारमार्थिक अनुभव साधकाला घ्यायचे असतील तर भक्तिमार्ग अत्यंत चांगला पर्याय आहे.

“तत्वज्ञानातील एकाद्या सिद्धांताची सत्यता व जिवंतपणा या सिद्धांतामध्ये जीवनाला दिव्यत्व व कृतार्थता प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य कितपत आहे यावरून ठरवायचे असते” असे के डी संगोराम म्हणतात. (के डी संगोराम प्रस्तावना : १९७८ : ७ )

भावेविण नकळे निसंदेह | गुरु विना अनुभव कैसा मिळे || (संत ज्ञानेश्वर : हरिपाठ : ५ ) हे सर्व पारमार्थिक अनुभव घ्यावयाची असतील तर मनुष्याला गुरु असावा लागतो, म्हणूनच संत ज्ञानेश्वरांनी आपले मोठे बंधू संत निवृत्तीनाथ यांनाच आपले गुरु मानले. या विश्वात्मक गुरुदेव निवृत्ती यांच्याजवळ त्यांनी पसायदान मागितले. ‘आत्मानुभूती’ हे जसे एकमेव सत्य व ध्येय असते तेच मानवतेच्या ऐक्याचे मूळ सूत्र ही असते. ईश्वर या एकाच सूत्रांमध्ये मानवसमूह गुंतला हे मानवतेचे ऐक्य हे अखंड विश्वकल्याणासाठी महत्त्वाचे आहे. ‘किंबहुना चराचर’ होऊन सर्व प्राणिमात्र व त्याप्रमाणे एकत्र गुण्यागोविंदाने राहिले पाहिजेत. या ठिकाणी फक्त मानवच नव्हे तर सर्व प्राणिमात्र एकत्र असले पाहिजेत. हाही एक ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा गाभा म्हणून आपल्याला पाहता येतो.

**सार तत्वाची संकल्पना**

वस्तूचे मूर्त स्वरूप व त्यातील सारतत्व एकच असते. आत्मा व शरीर हे भिन्न असले तरी त्यांच्यात एकत्व आहे, कारण आत्मा व शरीर वेगळे केले तर कुणाचेच अस्तित्व दाखवता येणार नाही. त्यामुळे चैतन्य हे वस्तू मध्येच सामावलेले असते, असे ग्रीक तत्वज्ञ व पाश्चात्य तत्त्वज्ञ म्हणतो नेमके हेच सूत्र पकडून ज्ञानेश्वरांनी सार तत्वाची संकल्पना मांडली आहे. ‘The real is the rational and the rational is the real’ असे हेगेल म्हणतो. (कुलकर्णी पद्मा : १९७८ :२६ ) सत् आणि चित् यांच्यात द्वंद्व संभवत नाही याच आधारे विश्वाच्या प्रणालीत प्रत्येक वस्तूचे स्थान अनन्यसाधारण असते. अनु रेणू पासून किडा-मुंगी ते मोठमोठ्या प्राण्यांमध्ये सत् चित् संकल्पना अनुस्यूत असते. विश्व ही संकल्पना त्यामुळेच मूर्त स्वरूपात टिकून राहते . ज्ञानेश्वरांनी व्यष्टी आणि समष्टी या अभिन्न आहेत असे मानले त्यामुळेच त्यांची चिद्विलास वादाची संकल्पना मांडली आहे. जे पिंडी ते ब्रम्हांडी याप्रमाणेच श्रीकृष्णाचे विश्वरूप दर्शन ज्ञानेश्वरीतील 14 व्या अध्यायात मधील ओवी क्रमांक १२० ते १२८ मध्ये घडते. श्रीकृष्णाची मी आणि दृश्य जग एकच आहे ही कल्पना अर्जुनाला सांगताना ज्ञानेश्वरांनी त्याची उकल करून सांगितले आहे. एका बाजूला हरिहर ऐक्य व जीव शिव ऐक्य यांच्यातून विश्वाची निर्मिती होते

हे जाणवते. 'अहम ब्रह्मास्मि' मी स्वतःच एक ब्रम्ह आहे याची जाणीव भक्ताला झाली म्हणजेच अद्वैत साधले जाते असे ज्ञानेश्वराना वाटते. "शैव आणि वैष्णव, ज्ञान आणि भक्ती, सगुण आणि निर्गुण ,माया आणि चिद्विलास, द्वैत आणि अद्वैत, प्रवृत्ती आणि निवृत्ती, व्यक्ती आणि समाज, श्रेयस आणि प्रेयस यांना एकत्र आणण्यात ज्ञानेश्वराना अडचण आली नाही . ही समन्वय प्रवृत्ती युरोपियन कान्ट व भारतीय तत्वज्ञानात साम्य असल्याचे जाणवते", असे प्राध्यापक रानडे म्हणतात. (आर डी रानडे : १९७८ :११६ )

एकूणच सर्व समाज व भक्ती तत्वज्ञान संत ज्ञानेश्वरांनी अतिशय सुंदर रीतीने विशद केले आहे.

**ज्ञान विज्ञान तत्त्वज्ञान**

ज्ञानेश्वरानी व्यावहारिक ज्ञानाला प्रपंचाचे ज्ञान असे संबोधले आहे. हे प्रापंचिक ज्ञान म्हणजेच विज्ञान होय, तर तार्किक ज्ञानाला त्यांनी 'ज्ञान' अशी संकल्पना वापरली आहे. विज्ञानामध्ये ज्ञाता ज्ञेय ज्ञान यांचा सहसंबंध असतो. ज्ञाता आणि ज्ञान यांचा अनुभव हा परमेश्वराच्या भक्तीतून साधकाला घेता येतो. ज्ञान हे सापेक्ष असते. जीवाला शिवाशी एकरूप व्हायचे असेल तर ज्ञान आणि भक्ती यांचा संगम पाहायला पाहिजे .सम्यक ज्ञान किंवा अपरोक्ष अनुभवातून माणूस ब्रह्म स्थितीला पोहोचतो. ज्ञानेश्वरा ज्ञानशास्त्राकडून सत्ता शास्त्राकडे माणसाला जाता येते. जीवापासून शिव आपणास वेगळा न करता यांच्यातील ऐक्य साधावे लागते. हेच तत्वज्ञान ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. लोकमान्य टिळक म्हणतात ," भाष्यकाराते वाट पुसत आपण आपली टीका रचली असे ज्ञानेश्वरानी स्वतः आपल्या ग्रंथाच्या अखेरीस म्हटले आहे, तथापि गीतेचा अर्थ अनेक सरस दृष्टांत आणि फुलवून सांगण्याची ज्ञानेश्वर महाराजांची शैली अलौकिक असून श्री शंकरांचार्याच्यापेक्षा विशेषता भक्तिमार्गाचे व काही अंशी निष्काम कर्माचे ही त्यांनी समर्थन केले असल्यामुळे ज्ञानेश्वरी हा गीते वरचा एक स्वतंत्र ग्रंथ मानला पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज हे स्वतः योगी होते म्हणून गीतेच्या सहाव्या अध्यायात पातंजल योग अभ्यास आला आहे." ( म वा धोंड : १९८० : ३९ )

मच्छिंद्राने बोध गोरक्षाची केला| गोरक्ष वोळला गहिनीप्रती|

गहिनी प्रसादे निवृत्ती दिधला | निवृत्ती वोळला ज्ञानाप्रती |

नाथ संप्रदायाची परंपरा ज्ञानेश्वरांना असली तरी ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार केला. नाथपंथातील हटयोग, ज्ञानयोग, संन्यास, परमेश्वर प्राप्तीची ओढ आपणास ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी, चांगदेव-पासष्टी, अमृतानुभव इत्यादीतून दिसून येते. या सार्‍याचा प्रभाव ज्ञानेश्वर यांच्या लेखनावर व तत्वज्ञानावर निश्चितपणे पडलेला दिसून येतो. उपनिषदे, गीता, गौडपादकारिका , योगवासिष्ठ, शंकर तत्वज्ञान, काश्मिरी शैव संप्रदाय आणि गुरु परंपरेने आलेले नाथपंथाचे तत्वज्ञान अशा विविध सप्तसिंधू ज्ञानेश्वरांच्या अद्वैत सागराला येऊन मिळाले दिसतात, असे डॉक्टर पेंडसे म्हणतात. यावरूनच ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानावरील प्रभावाचे आपणास मूल्यमापन करता येते.

एकूणच ज्ञानेश्वरांच्या लेखनाचा विचार करता सुगम महात्म्य, भक्ती महात्म्य त्याचबरोबर कर्मयोग आणि ज्ञानयोग यांचा सुरेख संगम ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानामध्ये साधलेला दिसून येतो

निष्कर्ष

१. निष्काम कर्मयोगाची संकल्पना ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथांमधून खूप सुंदर रीतीने सांगितलेली आहे.
२. ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्यांना समजेल व रुचेल अशा शब्दात भक्तीमार्ग पटवून दिला आहे .
३. ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या ‘स्वधर्म’ संकल्पनेतून धर्माचे उन्नत रूप आपणास पाहावयास मिळते.
४. नाथ संप्रदायातील हटयोग, कुंडलिनी योग, संन्यास याचा प्रभाव ज्ञानदेवांच्या तत्वज्ञानावर पडलेला आहे.
५. संस्कृत भाषेतील ज्ञान महाराष्ट्री प्राकृत भाषेत ज्ञानेश्वरांनी निरुपण केले आहे .

संदर्भ

१. संत ज्ञानेशवर , ज्ञानेश्वरी
२. कुलकर्णी पद्मा, ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान अकॅडमी ऑफ कमपेरेटीव्ह फिलोसोफी अंड बेळगाव 1978
३. पाटील बी. एन., प्राचीन महाराष्ट्र वांग्मय वैभव प्रशांत पब्लिकेशन जळगाव 2009
४. धोंड म. वा., ज्ञानेश्वरी तत्वज्ञान स्वरूप व विचार, मॅजेस्टिक बुक स्टॉल

मुंबई 1980

५. संगोराम के. डी .प्रस्तावना कुलकर्णी पद्मा, ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान अकॅडमी ऑफ कमपेरेटीव्ह फिलोसोफी अंड बेळगाव 1978

६. आर डी रानडे , वेदांता कल्मिनेशन ऑफ इंडियन थॉट, १९७८

संदर्भ ग्रंथ


१. संत ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरी अमृतानुभव हरिपाठाचे अभंग

२. कुलकर्णी पद्मा, ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान अकॅडमी ऑफ कंपरतिवे फिलोसोफी अंड बेळगाव 1978

३. धोंड म.वा, ज्ञानेश्वरी स्वरूप तत्वद्न्यान आणि काव्य मॅजेस्टिक बुक स्टॉल मुंबई. 1980

४. पाटील बी. एन., प्राचीन महाराष्ट्र वांग्मय वैभव प्रशांत पब्लिकेशन जळगाव 2009

५. कदम बाबा त. ब., ज्ञानदेवांचे तत्वज्ञान, ज्ञान प्रधान शास्त्र प्रकाशन अहमदनगर. 1997

६. खुपेरकर बाळाचार्य, विज्ञानेश्वर वांग्मयाचा सांगोपांग अभ्यास, पुणे विद्यापीठ पुणे. 1963